# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचनाक्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापितव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(अधिष्ठाता कार्यालय)**

**एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, जि. गडचिरोली- ४४२६०५**

जा.क्र. गों.वि.ग./अधि.कार्या./837 /२०२४ दि. २७/०६/२०२४

## परिपत्रक

विषय: **महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये "आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र" स्थापन करण्याकरीता पुढाकार घेण्याबाबत.**

**संदर्भ:** मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र. MSSDS/२०२३-२४/१५२६ दिनांक १५/०४/२०२४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना सुचित करण्यात येते की, बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रांमधील रोजगार उपलब्ध करुन देणे, स्वंयरोजगार करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना अर्थसहाय्य प्रदान करणे, कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमदवारांना रोजगारक्षम बनविणे ही सद्याच्या काळाची गरज पुर्ण करण्याच्या हेतूने राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनातील विविध विभागांतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षणाशी निगळीत सर्व योजना व कार्यक्रमांखाली निधीची सांगड घालून एकात्मिक अंमलबजाणीव्दारे कार्यप्रवण वयोगटातील (१५ ते ४५ वर्षापर्यंतच्या वयोगटातील) उमेदवारांचे अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास (Skill Development), कौशल्य वर्धन, पुनकौशल्य विकास (Reskilling) करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत केंद्र, राज्य व जिल्हा पुरस्कृत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांच्या माध्यमांतून राज्यातील १५ ते ४५ वयोगटातील युवक युवतींना विविध ३७ क्षेत्रांमध्ये (बॅकिंग, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी) कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवुन रोजगार अथवा स्वयंरोजगाराच्या संधी पुरविण्यात येतात.

National Skills Qualification Framework (NSQF) अन्वये स्थापित मानंकानुसार १८०० पेक्षा अधिक व्यवसायिक अभ्यासक्रमाचे संबधित प्रशिक्षण संस्थामार्फत उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत असुन सदर कौशल्य प्रशिक्षण NSQFA प्रणालीशी निगडीत आहे. प्रशिक्षणाअंती उमेदवारांचे मुल्यमापन (Assessment) आणि प्रमाणीकरण (Certification) हे केंद्र शासनाच्या National Council for Vocational Education Training - NCVET, National Skill Development Corporation - NSDC आणि Sector Skill Councils - SSC

किंवा महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाकडील (MSBSVET) मान्यताप्राप्त मुल्यमापन संस्थामार्फत (Assessing Body) करण्यात येते. सदर प्रमाणपत्र राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त असुन ह्या अभ्यासक्रमांमध्ये Vertical व Horizontal Mobility अंतर्भूत आहे.

महाराष्ट्र शासनाने महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी **"आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र"** ही नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे. आपल्या महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्र स्थापन करुन १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करुन त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. याकरीता केंद्र शासनामार्फत निश्चित केलेल्या Common Cost Norms नुसार कौशल्य विकास केंद्रांना विविध टप्यांमध्ये प्रती प्रशिक्षणार्थी सरासरी रु. ९,००० ते १५,०००/- पर्यंत प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते.

राज्यातील नामांकित महाविद्यालयांमध्ये **"आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र"** स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मनोदय आहे. याकरीता गुगल फॉर्म लिंक तयार करण्यात आली असुन त्याव्दारे आपल्या महाविद्यालयामध्ये **"आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र"** स्थापन करण्यासाठी दिनांक ३० जुन, २०२४ पर्यंत अर्ज करावयाचा आहे. त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील **"आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र"** मार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी गुगल फॉर्ममधील लिस्ट-B मध्ये नमुद असलेल्या Future Skill Job Roles चा प्रधान्याने विचार करावा.

याअनुषंगाने आपणास सुचित करण्यात येते की, गुगल फॉर्ममधील आवश्यक ती माहिती भरावी व सदर योजनेसाठी विहीत मुदतीत अर्ज करावा.

**Google form Link:**
**https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSeYeQH8Vr0z4Ye0R5MtICJwqXzUtF7HGIu5aIm33IXxeM46ng/viewform**

27/6/24

(डॉ. ए. एस. चंद्रमौली)
अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:**

१. मा. कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. श्री. अमोल खोडवे, सिस्टिम ॲनालिस्ट, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. यांनी सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करावे व विद्यापीठाशी संलग्नित सर्व प्राचार्यांना अवगत करावे.

CamScanner

# महाविद्यालयांनी ACKVK स्थापन करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करून इच्छुकता नोंदवावी

---

## अधिक माहितीसाठी (Knowledge Bank) खालील QR कोड स्कॅन करावा

अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी कार्यालयातील
श्री. विनय काटोलकर, कौशल्य अभियान अधिकारी-१ आणि
श्री. श्रीजन तायडे, यंग प्रोफेशनल, यांचेशी संपर्क साधावा.
ई-मेल आयडी- (smo1a@mssds.in / ypf.shrijan@gmail.com)
दूरध्वनी क्र- 022-22625651/53

CS CamScanner